# निसर्ग मार्गदर्शकांसाठी

## हस्तपुस्तिका



पायल मेहता आणि हर्षा जयरामय्या
(अनुवाद: विनायक पाटील)

# निसर्ग मार्गदर्शकांसाठी

## हस्तपुस्तिका

पायल मेहता आणि हर्षा जयरामय्या
(अनुवाद: विनायक पाटील)

nature
conservation
foundation

**Handbook for Nature Guides** by Payal Mehta and Harsha Jayaramaiah
**Illustrations** by Manasa Murari
**Design** by Janhavi Rajan
**Icons** by iconicbestiary/Freepik

© 2022 Nature Conservation Foundation, Mysuru.

**CC BY 4.0**
The text of this 'Handbook for Nature Guides' is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International (CC BY 4.0) license. The full text of this license is available at: creativecommons.org/licenses/by/4.0/
Copyright of the illustrations rests with NCF.

**Recommended Citation:** Payal Mehta and Harsha Jayaramaiah. 2022. Handbook for Nature Guides. Nature Conservation Foundation, Mysore.

*This manual has been printed on recycled paper.*

*Funded by:*

ROHINI
NILEKANI
philanthropies

Chola
Enter a better life

Rainmatter
Foundation

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| लेखकांचे मनोगत | I |
| समजून घेऊ निसर्ग मार्गदर्शन | १ |
| जाणून घेऊ निसर्ग | १० |
| जाणून घेऊ अतिथी | १४ |
| निसर्ग मार्गदर्शक: तुमची भूमिका | १७ |
| कसे व्हावे चांगले निसर्ग मार्गदर्शक | २० |
| तयारी निसर्ग अनुभवाची | २६ |
| ओळख मार्गदर्शनाच्या मुख्य तंत्राची | २८ |
| वन्यजीव पर्यटन आणि मार्गदर्शकांसाठी नीती नियमावली | ४६ |
| ऋणनिर्देश | ६१ |
| *तयारी आणि मूल्यांकनासाठी प्रश्नसूची* | |

# लेखकांचे मनोगत

या सृष्टीतील सर्व सजीव निसर्ग अभ्यासक असतात. प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने आपल्या भवतालातील वनस्पती आणि प्राण्यांना ओळखून, समजून घेत असतात. त्यांना नैसर्गिक प्रक्रियांची – पर्यावरणातील विविध चक्रे किंवा मग जैविक संस्थांची – जाणीव असते. स्थलांतर करणारे पक्षी रात्रीच्या वेळी आकाशवाचन करू शकतात. समुद्री कासवे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राची नोंद ठेवू शकतात. आपण मनुष्यप्राणी सुद्धा निसर्ग अभ्यासक होतो पण दिवसेंदिवस आपण निसर्गापासून दूर चाललो आहोत. निसर्ग आणि आपल्यात निर्माण झालेल्या या दरीला सांधु शकतात ते निसर्ग मार्गदर्शक.

निसर्ग मार्गदर्शक हा निसर्ग पर्यटन आणि एकंदर भटकंतीजन्य अनुभवांच्या संरचनेतील महत्वाचा घटक आहे. मात्र भारतात निसर्ग मार्गदर्शक हा काही मुख्य प्रवाहातील व्यवसाय नाही. बहुतेक निसर्ग मार्गदर्शक हे त्यांच्या आयुष्यातील कुठल्या तरी टप्प्यावर अचानकच या व्यवसायात ओढले जातात. काही मुलांना लहानपणापासूनच वन्यजीवांची आवड असते आणि त्यांच्यासाठी काहीतरी करावं अशी इच्छा असते. पण लहानपणापासून निसर्ग मार्गदर्शक व्हायचं असं ठरवून निसर्ग मार्गदर्शक झालेलं अजून तरी आम्हाला कुणी भेटलेलं नाही.

आमची गोष्ट सुद्धा काहीशी अशीच आहे. निसर्ग आणि निसर्ग अभ्यासातील आमच्या गोडीमुळे आम्ही कधीतरी व्यावसायिक मार्गदर्शक होण्याकडे ओढले गेलो. आणि हा

प्रवास आमच्यासाठी समृद्ध करणारा ठरला आहे.

वन्यजीवांच्या विश्वातील आम्हा दोघांची सुरुवात आणि प्रवास अगदीच वेगवेगळे होते (त्याची गोष्ट पुनः कधी तरी सांगूच!) पण दोघांनाही सुदैवाने अतिशय उत्कृष्ट असं निसर्ग मार्गदर्शनाचं शिक्षण मिळालं ते ताज सफारीमधून (ताज अँड बियॉन्ड हा दक्षिण आफ्रिकेतील प्रकल्प होता). त्यात आम्हाला ग्राहम व्हरक्युएल आणि सरथ सी. आर. या प्रशिक्षकांकडून  आणि आमच्या तिथल्या सहकाऱ्यांकडून निसर्गअभ्यासाचे आणि उत्तम मार्गदर्शनाचे धडे मिळाले.

नेचर कॉन्जर्वेशन फाऊंडेशन, गोरूकाना (बि. रं. थि. रिजर्व, कर्नाटक) आणि प्रदीप क्रिशन (राव जोधा पार्क) यांनी दिलेल्या संधी मुळे आम्ही लोकांना निसर्ग मार्गदर्शक व्हायचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. आजवर भारताच्या अनेक भागांत आम्ही निसर्ग मार्गदर्शक प्रशिक्षणे घेतली आहेत. या प्रशिक्षणांचा अनुभव अतिशय उत्साहवर्धक होता. प्रत्येक प्रशिक्षणात आम्ही इतकं काही शिकलो की या प्रशिक्षणांना आम्ही शिक्षणच म्हणू लागलो. यात भाग घेणारे सगळेच शिकत असतात.

निसर्गअभ्यास हा एक आयुष्यभर चालणारा ज्ञानार्जनाचा उद्योग आहे. थोड्या वेळात तज्ञ बनण्याची शक्यता इथे खूपच कमी आहे. विषयाची ओळख करून देता येते पण शिक्षण मात्र चालूच राहतं. उत्तम मार्गदर्शनाची कौशल्ये मात्र बऱ्याच अंशी शिकवता येतात.


या कौशल्यांमुळे अतिथींचा अनुभव समृद्ध करता येऊ शकतो. निसर्ग मार्गदर्शक फिरायला घेऊन जातो त्या पर्यटकांना आम्ही अतिथीच म्हणतो.

निसर्ग अभ्यास आणि मार्गदर्शन कौशल्ये यांच्या व्यतिरिक्त आजच्या काळातील निसर्ग पर्यटनातील महत्वाची गरज म्हणजे मूल्यव्यवस्था. या पुस्तिकेत आम्ही मार्गदर्शनाची

मूलभूत सूत्रे आणि निसर्ग पर्यटनातील मूल्यव्यवस्था मांडतो आहोत. उत्तम आणि जबाबदार निसर्ग मार्गदर्शकांसाठी ती आवश्यक आहे असं आम्हाला वाटतं.

निसर्ग मार्गदर्शक आणि प्रशिक्षक म्हणून काम करण्यातून आमचा जिवनानुभव समृद्ध झाला आहे. विविध नैसर्गिक अधिवासांत राहायला मिळालं, जगभरातील चित्रविचित्र लोकांच्या भेटी झाल्या, चरितार्थही चालू आहे. तुमच्यापैकी अनेकजण आमच्या या जमातीत सामील होतील हीच अपेक्षा.

—पायल आणि हर्षा



## समजून घेऊ

# निसर्ग मार्गदर्शन

निसर्ग मार्गदर्शन हा निसर्ग पर्यटनाचा भाग आहे. त्यामुळे आधी पर्यटन म्हणजे काय ते समजून घेऊ.

## पर्यटन म्हणजे काय?

मौजेसाठी किंवा कामासाठी प्रवास अशी पर्यटनाची व्याख्या केली जाऊ शकते. त्यामध्ये दौरे, पर्यटनस्थळे, अनुभव यांचा व्यापार करणारे लहानमोठे उद्योग, तसेच प्रवास, मुक्काम, जेवण आणि विविध उपक्रम पुरवणारे उद्योग यांचा समावेश होतो.

## पर्यटक म्हणजे कोण?

प्रवास करणारी कुणीही व्यक्ती पर्यटक असते. मग तो प्रवास मौजेसाठी किंवा औषधोपचार किंवा व्यवसाय किंवा इतर कोणत्याही कारणासाठी असू शकतो.

पर्यटकाच्या आवडीनुसार पर्यटन अनेकविध बाबींसाठी होऊ शकतं. उदाहरणार्थ:

- इतिहास
- संस्कृती आणि खाद्यसंस्कृती
- कला आणि स्थापत्य
- विहंगम दृश्ये
- विरंगुळा आणि आल्हाददायक हवामान
- तीर्थयात्रा किंवा धार्मिक
- योग आणि आरोग्य
- निसर्ग आणि वन्यजीव



- खेळ आणि साहस
- खरेदी!

*किंवा मग यापैकी कोणतेही दोन चार*

फक्त निसर्ग आणि वन्यजीव पर्यटन घेतलं तरी त्यातही कित्येक प्रकारचे प्रवासी असू शकतात. त्या प्रत्येकाचा निसर्ग आणि वन्यजीवांच्या कोणत्या तरी ठराविक पैलूमध्ये रस असतो:

- शांत, निवांत, निसर्गरम्य ठिकाणे
- महामार्जार प्राणी (वाघ, बिबट्या, सिंह, हिमबिबट्या, जग्वार)
- महासस्तन प्राणी (हत्ती, गेंडा, गवा, हरणे)
- जंगली वृक्ष आणि फुले
- पक्षी
- फुलपाखरे
- चतुर आणि टाचण्या
- समुद्री जलचर
- केवळ फोटोग्राफी!
- केवळ ध्वनिमुद्रण!

*आणि बरंच काही!*

तुम्हाला प्रश्न पडला असेल की निसर्ग मार्गदर्शक होऊ पाहणाऱ्या कुणासाठी याचा काय संबंध आहे. पण पर्यटन आणि पर्यटक यांचं हे ढोबळ चित्र डोक्यात असेल तर मार्गदर्शकाला पाहुण्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना उत्तम असा निसर्ग अनुभव देता येऊ शकेल.



## मार्गदर्शित निसर्ग पर्यटन

काही निसर्ग पर्यटकांना स्वतःचा स्वतः प्रवास करून निसर्गातले अनुभव शोधायचे असतात. इतरांना मात्र अशा पर्यटनस्थळी गेल्यावर एखाद्या तज्ञ किंवा मार्गदर्शकासोबत फिरायला आवडतं. त्याचबरोबर भारतातील बहुतेक अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये जाताना सोबत स्थानिक मार्गदर्शक घेणे बंधनकारक आहे.



## मार्गदर्शित निसर्ग पर्यटनाचे फायदे काय?

मार्गदर्शित निसर्ग पर्यटनाचे अनेक फायदे आहेत. आपण भेट देत असलेल्या प्रदेशातील वन्यजीव आणि संस्कृती यांच्याविषयी स्थानिक मार्गदर्शक किती तरी अधिक माहिती देऊ शकतात. स्थानिक मार्गदर्शकाची सुविधा घेतल्यामुळे त्या ठिकाणी रोजगाराच्या संधी आणि तिथल्या आर्थिक उलाढालीत आपण महत्वाचे योगदान देत असतो. सक्षम असे मार्गदर्शक त्यांचे अनुभव सांगून समाजात सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. वन्यजीवांची निगराणी आपोआप राखली जाते कारण मार्गदर्शक सदैव त्यांच्या मागावर असतात. सजग मार्गदर्शकासोबत फिरणाऱ्या पर्यटकांकडून नियमबद्ध वर्तणूकीची अपेक्षा ठेवता येते.

## निसर्ग मार्गदर्शक कोण असतो? त्याचे कार्य काय?

विविध संस्था आणि व्यक्ती या प्रश्नाचे उत्तर निरनिराळ्या प्रकारे देतात. त्यापैकी काही व्याख्या आपण पाहू:

*'निसर्ग मार्गदर्शक म्हणजे नैसर्गिक पर्यावरण आणि पाहुणे यांच्यात निसर्ग-आकलन आणि निसर्ग-शिक्षण यावर भर देणारा दुवा. तो किंवा ती निसर्ग आणि वन्यजीवांचे विविध पैलू उलगडून दाखवत सर्वंकष शिक्षणाचा अनुभव देत असतात. निसर्ग मार्गदर्शनाचे महत्वाचे सूत्र म्हणजे वर्तणूकीची सर्वसाधारण मूल्ये जपत नैसर्गिक पर्यावरणाची मुद्देसूद माहिती आणि अर्थपूर्ण आकलन करून देणे. पाहुण्यांची सुरक्षा आणि मनोरंजन या प्राथमिकता सांभाळत असतानाच असा अनुभव देण्याचे काम  उत्तम प्रशिक्षित आणि दर्जेदार सेवा देणारे मार्गदर्शक करू शकतात.'*

-बुशवेल्ड ट्रेनिंग ॲडवेंचर्स, दक्षिण आफ्रिका

bit.ly/game-ranger-tour-guide-or-nature-guide

*'पर्यटन व्यवसायातील एक महत्वाचा आघाडीचा घटक म्हणजे दौरा मार्गदर्शक. पर्यटनस्थळाची आकर्षणे आणि संस्कृती याबद्दल त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाचा आणि आकलनाचा उपयोग करून, शिवाय आपली संभाषण आणि सेवा कौशल्ये वापरुन पर्यटकाच्या दौऱ्याचे समृद्ध अनुभवात रूपांतर करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते.'*
-जॉन ए. पी. आणि केविन के. एफ. वॉंग (ऑक्टोबर २००१). 'केस स्टडी ऑन टूर गायडींग: प्रोफेशनलिज्म्, इश्यूज अँड प्रॉब्लेम्स'

bit.ly/case-study-on-tour-guiding

*'पर्यटकांना पर्यावरणाचे महत्व सांगून, पटवून देणारे; त्यांचे पर्यावरणीय आघात सौम्य होतील असे वर्तन घडवणारे; नैसर्गिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाची शाश्वतता टिकवून ठेवणारे; आणि त्यांच्या आयुष्याचा दर्जा एकंदर परिस्थितिकीय आणि सांस्कृतिक संदर्भात तपासून बघण्यास प्रवृत्त करणारे सक्षम असे (ग्रीक) इकोटूर गाइडस् तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टामागची भूमिका अशी आहे की निसर्गपर्यटन स्थळांची यथार्थ आणि परिणामकारक माहिती पुरवून आणि सोबतच पर्यावरणस्नेही वर्तन घडवून आणि त्याचे अनुश्रवण करवून पर्यटनाचे विधायक परिणाम वृद्धिंगत करता येतील आणि दुष्परिणाम टाळता येतील. स्थानिक समुदाय अशा निसर्ग पर्यटन स्थळांचे पर्यावरणीय व्यवस्थापन करण्यास पुढे येतील.'*
-कॉन्स्टंटिना स्कनावीस आणि ख्रिस्तोस जियानुलीस (जानेवारी २०१०)
इंप्रुव्हीन्ग क्वालिटी ऑफ इकोटुरिजम थ्रू ॲडवांसिंग एजुकेशन अँड ट्रेनिंग फॉर इकोटुरिजम गाइडस्

bit.ly/case-study-on-tour-guiding

*'निसर्ग पर्यटन जगभरात, त्यातल्या त्यात विकसनशील देशांमध्ये, वाढत चाललं आहे. तिथे ते साधारणपणे संरक्षित क्षेत्रांमध्ये प्रचलित होत आहे (विव्हर, १९९८). निसर्ग पर्यटन अनुभव देण्यात मार्गदर्शकांची मोठी भूमिका आहे. पर्यटकांची सुरक्षितता सांभाळणे, स्थळांचे अचूक आणि रोचक आकलन करून देणे, सुयोग्य पर्यावरणीय आणि सांस्कृतिक वर्तनाचा आदर्श घालून देणे.'*

-रोजमेरी ब्लॅक, सॅम हॅम, आणि बेट्टी वेइली (जुने २००१). 'इकोटूर गाइड ट्रेनिंग नि लेस डेवलप्ड कंट्रीज: सम प्रिलिमीनरी फायन्डीन्गज्'

bit.ly/ecotour-guide-training

आमच्या मते निसर्ग मार्गदर्शक म्हणजे माहितीपर, आनंददायी आणि नियमबद्ध असा रानावनातला अनुभव देणारे लोक. त्यांचं काम केवळ प्राणी नेमके शोधणं आणि त्यांची ओळख करून देणं इतकंच नाही तर त्या पर्यावरणात नेमकं काय घडतं आहे त्याचं आकलन करून देणं, त्या सजीवांचा सृष्टीतील कार्यभाग समजून देणं, त्या जागेच्या आणि तिथल्या लोकांच्या गोष्टी सांगणं, संवर्धन प्रयत्नांची माहिती देणं आणि बरंच काही. हे त्यांना पर्यटकांची सुरक्षा आणि त्यांची आवड लक्षात ठेऊन करायचं असतं.

त्यांच्याकडे लोकांत मिसळण्याची आवड, नियोजनाची कौशल्ये, आणि निसर्गाप्रति प्रेम असायला हवं. अशा प्रकारची कौशल्ये आणि ज्ञान असेल शिवाय नम्रता, सहृदयता आणि मिश्किल स्वभाव यांचे योग्य मिश्रण असलेले मार्गदर्शक आदर्श ठरतात.

आता टप्प्याटप्प्याने निसर्ग मार्गदर्शकाची आणि त्याच्या कामाची आपल्या भारतीय संदर्भात ओळख करून घेऊ.

# निसर्गवाचक की निसर्ग मार्गदर्शक

निसर्गवाचक म्हणजे अशी व्यक्ती जी निसर्ग, वन्यजीव यांचे नैसर्गिक अधिवासात निरीक्षण, अभ्यास करून त्या विषयात माहीतगार झालेली असते. वर्गात किंवा प्रयोगशाळेत अभ्यास करणाऱ्या व्यक्तींचा यात सहसा समावेश केला जात नाही.

भारतात आपण केवळ निसर्गाची माहिती असणाऱ्यांनाच नव्हे तर निसर्ग किंवा वन्यजीव भ्रमंतीवर पर्यटकांना घेऊन जाणाऱ्या व्यक्तींना सुद्धा निसर्गवाचक म्हणतो. ते निसर्गातील घटनांचा अर्थ लावतात आणि तो पर्यटकांना समजून देतात.




याला पर्यायी शब्द म्हणून तुमच्या कानावर मार्गदर्शक, निसर्ग मार्गदर्शक, वन्यजीव दौरा प्रमुख, स्थानिक मार्गदर्शक, उद्यान मार्गदर्शक इत्यादी शब्द आले असतील.
इतर देशांत अशाच प्रकारचे काम करणाऱ्या लोकांना रेंजर, सफारी गाइड, ट्रेल गाइड इत्यादी नावे आहेत.

कुणीही निसर्गवाचक बनू शकतं. कुठलेही औपचारिक शिक्षण त्यासाठी आवश्यक नाही. फक्त आवड असली, निसर्ग समजून घेण्याची ओढ असली आणि लोकांना सांभाळून घेण्याची काही कौशल्ये असली की पुरे.



## जाणून घेऊ

# निसर्ग



निसर्गवाचन म्हणजे निसर्गाचे – वनस्पती, प्राणी, बुरशी आणि इतर सजीवांचे त्यांच्या नैसर्गिक अधिवासात – निरीक्षण आणि अभ्यास करणे. त्यांच्या नोंदी कशा घ्यायच्या, त्यांची ओळख कशी पटवायची, त्यांचं वर्तन आणि जीवनचक्र कसं असतं, वनस्पती आणि प्राणी एकमेकांशी आणि त्यांच्या पर्यावरणाशी कसे आंतरक्रिया करतात – या सर्व प्रश्नांची उत्तरं शोधणे म्हणजेच निसर्गवाचन.

आतापर्यंत तुमच्या लक्षात आलंच असेल की निसर्गवाचनाचं ज्ञान निसर्ग मार्गदर्शकासाठी अत्यंत आवश्यक आहे. अर्थात, निसर्गवाचन हा विषय अमर्याद असल्याने कुणीच त्यातला सर्वज्ञानी होऊ शकत नाही. पण तुमच्या परिसरातील निसर्ग, तिथले सजीव यांची जास्तीतजास्त माहिती करून घेतल्यास तुम्ही चांगले निसर्ग मार्गदर्शक होऊ शकता.

निसर्गातील घटकांविषयी जाणून घ्यायला सुरुवात करण्यासाठी सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे निसर्गाचे निरीक्षण करत स्वतः रानावनात भटकणे. जर आसपास जंगल किंवा इतर अबाधित अधिवास असतील तर उत्तमच. पण ते नसले तरी काही बिघडत नाही. शेतीवाडी, रोपवने यासारखे विस्तृत अधिवास किंवा परसबाग, एरवी गजबजलेल्या शहरातील उद्याने, अगदी उंच इमारतीतील फ्लॅटच्या गच्चीत कुंड्या मांडून केलेली लहानशी बाग सुद्धा निरनिराळे पक्षी, किटक, वनस्पती इत्यादींचे निरीक्षण करण्याच्या असंख्य संधी देऊ शकतात.

जर तुम्ही फील्डमध्ये (निसर्ग अभ्यासकांसाठी 'फील्ड' म्हणजे घराबाहेर कुठेही पण निसर्गाच्या सानिध्यात) एखाद्या पक्षी निरीक्षकाच्या, वनस्पती तज्ञाच्या, किंवा निसर्गाचे ज्ञान असणाऱ्या कुणाही सोबत  वेळ घालवू शकत असाल तर तुमच्या ज्ञानसाधनेला आरामात सुरुवात होईल. एक चांगला निसर्गवाचक गुरु भेटल्यास पुढची ज्ञानसाधना अगदी सोपी होऊन जाते. एखाद्या स्थानिक निसर्ग मंडळाचे सभासद व्हा. त्यात हमखास अशी मंडळी भेटतात. शिवाय, समविचारी लोकांच्या सोबत फिरायला आणि शिकायला बाहेर पडण्याची मजा काही औरच असते.

आवर्जून सांगावी अशी आणखी एक गोष्ट म्हणजे निसर्गाचे निरीक्षण करताना जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा नोंदी ठेवण्याची सवय लावून घ्या.  नेहमी एक छोटी वही आणि पेन/पेन्सिल सोबत ठेवा. तुमची निरीक्षणे लिहा, जे दिसेल त्याची साधी चित्रे काढा, हवामान कसं होतं ते लिहा, तुम्हाला एकंदरीत कसं वाटलं ते ही लिहा. ह्या उपक्रमातून निसर्ग समजून घेतानाच आणखी अनेक गोष्टी शिकायला मिळतात. कोणत्याही गोष्टीवर लक्ष केंद्रित कसं करायचं, कसं बघायचं किंवा ऐकायचं, आणि हे सगळं करताना कोणतीही घाई गडबड करायची नाही. अगदी अलीकडेपर्यंत  अशा नोंदी ठेवण्याची पद्धत निसर्ग अभ्यासकांमध्ये लोकप्रिय होती. पण आता तंत्रज्ञान इतकं पुढे गेलेलं आहे की कुणी नोंदी घेताना दिसतच नाही. काहीही नवीन दिसलं की आपण पटकन फोटो घेतो आणि पुढे चालू पडतो. थांबून, वेळ देऊन नीट निरीक्षण करणं अगदी दुर्मिळ झालेलं आहे.

निसर्गात भटकंती करताना मिळणारे ज्ञान इतरांच्या अनुभवाशी तोलून पाहून ते बिनचूक करण्यासाठी असंख्य पुस्तके आणि इंटरनेट वरील साहित्य उपलब्ध आहे. त्यांचा उपयोग वनस्पती आणि प्राण्यांच्या विविध प्रजातींची ओळख पटवण्यासाठी सुद्धा होतो. त्यातली काही महत्वाची साधने आम्ही सुचवतो:

## इंटरनेटवर

wildwanderer.com
lifemeetsthelens.com
ifoundbutterflies.org
flowersofindia.net
jlrexplore.com
indiabiodiversity.org
early-bird.in/webinars
SeasonWatch's Youtube channel
Kottayam Nature Society's Youtube channel

## मार्गदर्शी पुस्तिका

पक्षी, फुलपाखरे, वनस्पती यांवरची तुमच्या प्रदेशातील स्थानिक मार्गदर्शी पुस्तके उपलब्ध असू शकतात. काही प्रदेशांत तर साप, उभयचर, चतुर आणि टाचण्या किंवा इतर प्राण्यांच्या ओळखीसाठीसुद्धा मार्गदर्शी पुस्तिका उपलब्ध असतात. देशभरात कुठेही वापरता येतील अशी काही मार्गदर्शी पुस्तके पुढीलप्रमाणे:

*Indian Mammals* — Vivek Menon
*Birds of the Indian Subcontinent* — Richard Grimmett, Carol Inskipp & Tim Inskipp
*Wildlife of South India* — Surya Ramachandran & David Raju
*Wildlife of Central India* — David Raju & Surya Ramachandran
*Jungle Trees of Central India* — Pradip Krishen
*A Field Guide to the Spider Genera of India* — Ayan Mondal, Debomay Chanda, Atul Vartak & Siddharth Kulkarni
*Butterflies of India* — Isaac Kehimkar
***साप*** — निलीमकुमार खैरे
***महाराष्ट्रातील फुलपाखरे*** — राजू कसंबे

## निसर्ग इतिहासावरील इतर काही रोचक पुस्तके

*The Weavers* — Geetha Iyer
*The Songs of Trees* — David George Haskell
*A Naturalist on the Prowl* — EHA
*The Wild Heart of India* — TR Shankar Raman
*Of Birds and Birdsong* — M Krishnan
*The Fall of a Sparrow* — Salim Ali
*Jungle Lore* — Jim Corbett
*A Naturalist's Journal* — M Yuvan

जाणून घेऊ

# अतिथी



निसर्ग मार्गदर्शन जितकं निसर्गाला समजून उमजून घेण्याशी संबधित आहे तितकंच ते निरनिराळ्या लोकांना समजून घेण्याशी, त्यांना सांभाळून घेण्याशी संबंधित आहे. मार्गदर्शक घेऊन फिरणाऱ्या पर्यटकांना आम्ही 'अतिथी' म्हणतो. ग्राहक, पर्यटक, अभ्यागत असे अनेक शब्द ऐकायला मिळतात पण आम्ही अतिथीच म्हणतो.

## अतिथी कोण असतात? कसे असतात?

अतिथी:

- जगाच्या कुठल्याही भागातले असू शकतात
- कुठल्याही संस्कृतीत वाढलेले असू शकतात
- कुठलीही भाषा बोलणारे असू शकतात
- कुठल्याही वयाचे असू शकतात
- कुठल्याही शैक्षणिक पार्श्वभूमीचे असू शकतात
- कुठलाही व्यवसाय करणारे असू शकतात
- खूप फिरलेले किंवा अगदीच न फिरलेले असू शकतात

*अतिथी कुणीही असू शकतात!*

## अतिथी कोणत्याही स्थळाला का भेट देतात?

कोणत्याही स्थळाला भेट देण्याची पर्यटकांकडे अनेक वेगवेगळी कारणे असू शकतात. त्यातली काही आपण बघू:


- वन्यजीव बघण्यासाठी (कधी कधी केवळ पक्षी, रानफुले किंवा महामार्जार असे काही ठराविक प्राणी पाहायचे असतात)
- फोटोग्राफी करण्यासाठी
- साहस म्हणून किंवा रोजच्या धबडग्यापेक्षा वेगळं काही करण्यासाठी
- कुणीतरी त्या ठिकाणी जा म्हटलं म्हणून किंवा समाजमाध्यमावर त्या स्थळाचे फोटो बघितले म्हणून
- वाढदिवस किंवा लग्नाची तारीख साजरी करण्यासाठी

- शाळेच्या किंवा ऑफिसच्या सुट्ट्या घालवण्यासाठी
- शांत, निवांत स्थळी तणावमुक्त वेळ घालवण्यासाठी
- धार्मिक कारणांसाठी
- नवीन ठिकाण पाहण्यासाठी, सुंदर नजारे पाहण्यासाठी

*किंवा आणखी काहीही... कुठलंही कारण असू शकतं!*

भविष्यात ज्या कुणाला मार्गदर्शक व्हायचं आहे, त्यांना त्यांचे अतिथी कशा कशा प्रकारचे असू शकतात याचं गणित नेहमी डोक्यात ठेवणं आवश्यक आहे. मोकळ्या मनाने तुमच्या अतिथींची व्यक्तिमत्वे आणि आवडी लक्षात घेऊन त्यांना मार्गदर्शन करणं उपयुक्त असतं. आम्ही याला अतिथीवाचन म्हणतो.

## निसर्ग मार्गदर्शक



# तुमची भूमिका

निसर्ग मार्गदर्शक लोकांना निसर्गाच्या प्रेमात पाडू शकतात आणि त्यांच्या दृष्टीला भोवतीच्या चित्ताकर्षक सजीव सृष्टीची ओळख करून देऊ शकतात.

*'अखेरीस, आपण ज्यावर प्रेम करतो केवळ त्याचेच संरक्षण करू; जे समजून घेऊ शकतो केवळ त्यावरच प्रेम करू; आणि जे शिकवलं जातं केवळ तेच समजून घेऊ.'*
—बाबा डायम

**निसर्ग आणि पर्यटकांच्या मधला दुवा**
निसर्ग मार्गदर्शक अतिथींना त्यांच्या सभोवती घडणाऱ्या सृष्टीतील घटनांचे आकलन करून देतात.

*पण तेवढंच नाही!*

**तुमच्या प्रदेश आणि संस्कृतीचे प्रतिनिधी**
कोणतेही मार्गदर्शक खास करून स्थानिक मार्गदर्शक त्या ठिकाणाचा चेहरा असतात. ते असं भिंग असतात ज्यातून अतिथी संस्कृती, दैनंदिन जीवनशैलीचा अनुभव घेत असतात किंवा स्थानिक समुदायांची ओळख करून घेत असतात.

**माहितीचा मुख्य स्रोत**

अतिथींसाठी एखाद्या भ्रमंती किंवा संपूर्ण दौऱ्यादरम्यान मार्गदर्शकच माहितीचे प्राथमिक आणि सर्वात मोठे स्रोत असतात. मार्गदर्शकाकडून ते सतत शिकत असतात. त्यामुळे मार्गदर्शकांनी संबंधित विषयातील आपलं ज्ञान वाढतं ठेवून अचूक आणि अद्ययावत माहिती दिली पाहिजे. ही एक फार मोठी जबाबदारी आहे.

**जबाबदार पथकप्रमुख**

एखाद्या दौऱ्यासाठी किंवा भ्रमंतीसाठी मार्गदर्शक हे अतिथींच्या गटाचे प्रमुख असतात. ती भटकंती सुरळीत चालावी, अतिथी सुरक्षित राहावेत, निसर्ग आणि स्थानिक समुदायांशी भेटीगाठी करताना नेहमी नियमबद्ध वर्तन व्हावं ही जबाबदारी मार्गदर्शकाची असते.

**नवीन ठिकाणचे मित्र**

नवीन ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांसाठी त्यांचे मार्गदर्शक हे त्या ठिकाणचे त्यांचे एकमेव मित्र असतात. आणि हे नातं खूप महत्त्वाचं आहे. त्यांना काहीही गरज पडली किंवा कुठली असुविधा झाली तर मार्गदर्शकांनाच ते संपर्क करू शकतात. तिथल्या लोकांविषयी, स्थळे आणि वन्यजीवांविषयी विचारू शकतात. अनेकदा अशी मैत्री आयुष्यात पुढे अनेक वर्षे टिकून राहते.


केवळ अतिथी नव्हे तर स्थानिक लोकांनाही जागृत करू शकतात

इतकं ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे मार्गदर्शक स्थानिक पर्यावरणीय समस्या आणि संवर्धन प्रकल्पांचे महत्व समजू शकतात. या सगळ्या ज्ञानाचा उपयोग करून ते अतिथींसाठी त्या ठिकाणचं एक प्रामाणिक चित्र उभं करू शकतात. कित्येक मार्गदर्शक

स्थानिक संवर्धन प्रकल्पांना हातभार लावतात, त्यांच्या समाजात जाणीवजागृती करतात आणि नागरीक-विज्ञान प्रकल्पांसाठी काम करतात.



## कसे व्हावे चांगले



# निसर्ग मार्गदर्शक

*निसर्ग मार्गदर्शन जितकं निसर्ग इतिहासाविषयी आहे तितकंच माणसांविषयी आहे. मार्गदर्शकाचे काही गुण आपण पाहू.*

## चांगले मार्गदर्शक:

**अतिथीवाचन करू शकतात**
अतिथींच्या क्षमता आणि अपेक्षा पटकन लक्षात आल्या पाहिजेत. तुमचे अतिथी कोणत्याही सांस्कृतिक किंवा शैक्षणिक पार्श्र्वभूमीचे असू शकतात हे नेहमी लक्षात ठेवा. त्यांची शारीरिक क्षमता निरनिराळी असू शकते आणि त्यांना कोणत्याही गोष्टीत रस असू शकतो! हे समजून घेतलं की तुम्हाला आवश्यक ते बदल करून कोणत्याही गटासाठी अनुरूप अशी भ्रमंती आखता येऊ शकते.

**निसर्गात/रानावनात रमतात**
मार्गदर्शक भ्रमंतीदरम्यान आनंदी असेल तर अतिथीसुद्धा आपसूकच ती ऊर्जा शोषून घेतात आणि भटकंतीचा आस्वाद घ्यायला लागतात. कंटाळलेले मार्गदर्शक कधीच सुंदर असा निसर्ग अनुभव देऊ शकत नाहीत.

**ज्ञान वाटायला तयार असतात**

अतिथींना मार्गदर्शक जास्तीतजास्त माहिती देण्यास तत्पर आहे हे लगेच लक्षात येतं. यामुळे अतिथी अधिक रस घ्यायला लागतात आणि त्यांचे कुतूहल वाढून ते प्रश्न विचारायला उद्युक्त होतात. माहितीची देवाणघेवाण करत केलेली भटकंती नेहमीच आनंददायी ठरते.

**मैत्रीपूर्ण असतात**

तुमचे अतिथी सुट्टीवर आहेत आणि नवीन ठिकाणी आहेत हे लक्षात ठेवा. कदाचित त्या ठिकाणी त्यांना नीट माहीत होणारे तुम्ही एकमेव व्यक्ती असाल.

**काम व्यावसायिकपणे करतात**

मैत्रीपूर्ण वागतानाच व्यावसायिकपणा जपण्याची नाजूक कसरत करावी लागते. मार्गदर्शकांनी मैत्रीपूर्ण वागताना जास्तच मोकळेढाकळे होणं आणि मार्गदर्शनाची सूत्रे वाऱ्यावर सोडून देणं टाळायला हवं. अतिथींना एक चांगला अनुभव द्यायचा आहे यावरच लक्ष केंद्रित असलं पाहिजे.

**चांगल्या कानाचे असतात**

भ्रमंती चालू असताना माहितीचा प्राथमिक स्रोत असल्यामुळे मार्गदर्शकच सर्वात जास्त बोलत असतात. तो त्यांच्या कामाचा अविभाज्य भाग आहे. पण त्याचवेळी इतरांना ऐकून घेण्याची त्यांची तयारी असायला हवी. अतिथींना प्रश्न विचारायचे असतात, त्यांचे अनुभव सांगायचे असतात, माहितीत भर घालायची असते. कधी कधी फक्त त्यांना होणारा त्रास सांगायचा असतो किंवा मग कशाची तरी प्रशंसा करायची असते. मार्गदर्शकांनी नेहमी त्यांना ऐकून घेण्यासाठी सतर्क असायला हवं.

**उत्साही आणि चपळ असतात**

उत्साह हा संसर्गजन्य असतो. आळशी मार्गदर्शक संपूर्ण अनुभवाची ऊर्जा संपवून टाकू शकतो.

**संयत, सुस्वभावी आणि थंड डोक्याचे असतात**

सर्वांनाच नम्र, संयमी आणि समजूतदार माणसांच्या सोबत राहणं आवडतं. नव्या ठिकाणी आणि नेहमीच्या नसलेल्या निसर्ग भ्रमंतीच्या वेळी अतिथी त्यांच्या सौख्य कक्षेच्या बाहेर असतात हे लक्षात ठेवा. सुस्वभावी मार्गदर्शक सोबत असेल तर त्यांना भ्रमंती आरामदायक आणि सुखकारक वाटू शकेल.

**सतत शिकायला तयार असतात**

कुणीही निसर्ग मार्गदर्शक सर्वज्ञानी असू शकत नाही. प्रत्येक नव्या भ्रमंतीत नवीन प्रश्न येऊ शकतात. आपल्याला माहीत नसल्याची कबुली देणं आणि उत्तरं मिळवण्याची उत्सुकता असणं कधीही चांगलं. एक निसर्ग मार्गदर्शक म्हणून विकसित होण्याचा आणि ज्ञानार्जन सातत्याने करत राहण्याचा हा उत्तम मार्ग आहे. जितकं तुमचं ज्ञान बिनचूक आणि अद्ययावत तितकेच चांगले तुम्ही मार्गदर्शक. शिवाय, कल्पना करा, वर्षानुवर्षे सतत तीच तंतोतंत माहिती देत राहणं किंवा तशीच संभाषणे करणं किती कंटाळवाणं असेल!

पर्यटन काळ नसताना किंवा इतर मोकळ्या दिवशी आपला वेळ शिकण्यात घालवला पाहिजे. एकट्यानेच भ्रमंतीसाठी बाहेर पडा किंवा शक्य असेल तर एखाद्या नवीन ठिकाणाला भेट द्या. वन्यजीव गणनेत भाग घ्या किंवा वन्यजीव संरक्षण करणाऱ्या संस्थेत स्वयंसेवक व्हा.

दुसरी एक पद्धत म्हणजे तुमच्या पसंतीचा एखादा विषय किंवा प्राण्यांचा गट निवडा. त्याबद्दल माहीत करून घेणे, वाचणे, समजून घेणे हा तुमचा स्वतःचा प्रकल्प बनवा.

### चांगले गोष्टीवेल्हाळ व्हा

वय किंवा पार्श्वभूमी काहीही असली तरी सगळ्यांनाच गोष्टी ऐकायला आवडतं. निसर्गातील घटना मजेशीर आणि अविस्मरणीय करून सांगणं ही एक मोठीच हातोटी असते. निसर्गात अचंबित करून सोडणाऱ्या गोष्टींची कमतरता नाही. शिवाय नेहमी लक्षात ठेवा की तुमचे अतिथी सुट्टी घालवायला आलेले आहेत. त्यांना बातमीपत्रासारखी माहिती ऐकण्यापेक्षा गोष्टींतून नवीन काही तरी शिकायला अधिक आवडेल.



# निसर्गवाचकाची कौशल्ये



- संभाषण कौशल्य
- निरीक्षण कौशल्य
- ज्ञान

# निसर्गवाचकाची साधने




- वही आणि पेन
- मार्गदर्शी पुस्तके
- दुर्बिण आणि दूरदर्शी
- नवीन तंत्रज्ञानावर आधारित साधने, इंटरनेट, विविध विषयांवरची ॲप्स्

## तयारी


# निसर्ग अनुभवाची

- कालावधी, अंतर, भूभाग आणि वन्यजीव दर्शन यांचा मेळ साधण्यासाठी योग्य असा भ्रमंती मार्ग निवडा
- भ्रमंतीसाठी योग्य वेळ निवडा. सूर्योदयाची/सूर्यास्ताची वेळ, वन्यजीव सक्रिय असण्याची वेळ, हवामान इत्यादी बाबी डोक्यात ठेवा.
- गरज असेल तर परवानग्या किंवा प्रवेशिका आधीच घेऊन ठेवा
- शक्य असल्यास भ्रमंती मार्गाची एकदा स्वतः टेहळणी करून या.
- वाचन करा! ठरलेली निसर्ग भ्रमंती जर नेहमीची नसेल तर त्या मार्गाविषयी, त्या ठिकाणाची माहिती मिळवणं अत्यंत आवश्यक आहे
- तुमच्या साधनांचा संच तयार ठेवा आणि त्यात तुम्हाला लागतील ती सर्व साधने आहेत याची खात्री करा.

जवळपास प्रत्येक सफरीवर किंवा भ्रमंती दरम्यान काही ना काही अप्रिय घटना घडतातच. बहुतेक अतिथी त्या समजून सुद्धा घेतात. पण आपल्या तयारीच्या अभावामुळे पाहुण्यांची गैरसोय होऊ नये इतकी खबरदारी आपण घ्यायलाच हवी.


कालावधी
स्थानिक
आकर्षणे
शारीरिक
क्षमता
योग्य असा भ्रमण मार्ग निवडा
पसंती

## ओळख



# मार्गदर्शनाच्या मुख्य तंत्राची

मार्गदर्शनाचे तंत्र म्हणजे तुमच्या पाहुण्यांचा निसर्ग अनुभव समृद्ध करण्यासाठी योग्य प्रकारे उपक्रम राबविण्याच्या काही सूचना आणि संकेत.हे काही नियम नाहीत. फक्त दिशादर्शन आहे हे लक्षात ठेवा. तुमचा प्रदेश, तुमचा भ्रमणमार्ग आणि तुम्हाला दिसणारे प्राणी आणि वनस्पती यांना अनुसरून ह्या सूचना तुम्ही वापरा किंवा त्यात बदल करून घ्या.

निरंतर सरावाने हे तंत्र अधिकाधिक प्रभावी होत जातं.

### भ्रमंतीची सुरुवात

- स्वागत करा (हसून आणि उत्साहाने)
- ओळख करून द्या (हसून, निःशंकपणे)
- पाहुण्यांना उपक्रमाची थोडक्यात माहिती द्या:
    - अपेक्षा निश्चित करा: उपक्रम किती काळ चालेल, भूभाग कसा आणि किती अवघड असेल, कोणते अधिवास आणि वन्यजीव बघायला मिळतील
    - तयारीचा आढावा घ्या: पाहुण्यांचे कपडे, पादत्राणे योग्य आहेत का आणि त्यांच्याकडे असलेले पाणी, खाद्यपदार्थ इत्यादी.

- सावधगिरीच्या सूचना आवश्यक असतील तर त्या द्या (निसरड्या जागा, काटेरी झुडपे इत्यादी)
- भ्रमंतीच्या नियमांची माहिती द्या, कोणत्या गोष्टी पाळाव्या आणि कोणत्या टाळाव्या ते सांगा (या पुस्तिकेतील नीतीनियमांचा भाग बघा)
- पाहुण्यांना उत्साहाने भ्रमंती सुरू करण्यास आमंत्रित करा: 'चला तर, सुरू करूया!'



# अवलोकन क्रम

भ्रमंती दरम्यान कोणतीही कुतूहलजनक वनस्पती, प्राणी, घटना दिसल्यावर ती पाहुण्यांना नीट दाखवून तिचा आनंद लुटण्यासाठी मार्गदर्शकाने पार पाडायचे टप्पे म्हणजे अवलोकन क्रम.

कोणत्याही दृश्याचा परिपूर्ण अनुभव घेण्यासाठी अवलोकन क्रम महत्त्वाचा आहे. नवीन मार्गदर्शकाला सुरुवातीच्या काळात असा क्रम लक्षात ठेऊन प्रत्यक्ष पाळणे म्हणजे काही तरी अतीच वाटू शकतं. तसं वाटणं साहजिकच आहे. हा क्रम म्हणजे गाडी चालवायला शिकण्यासारखं आहे. पुरेसा सराव झाल्यावर गियर बदलणे किंवा पायटे वापरणे यात गोंधळ उडत नाही.

१. शोधाचा क्षण
२. सर्वांना दिसेल याची खात्री करा
३. बघण्यासाठी/ऐकण्यासाठी पुरेसा वेळ द्या
४. स्पष्टपणे दर्शवून वर्णन करा
५. गोषवारा द्या

कल्पना करा की तुम्ही निसर्ग भ्रमंती करताय आणि तुम्हाला शेकरू दिसलं. आता तुम्ही हा अवलोकन क्रम कसा वापराल त्याचे उदाहरण पाहू:

## १. शोधाचा क्षण

एखादा प्राणी दिसल्यावर ही मार्गदर्शकाची पहिली प्रतिक्रिया असते. हा क्षण उत्साहाचा, उत्तेजित करणारा, आश्चर्याचा असतो. तुमच्या प्रतिक्रियेत या सर्व गोष्टी यायला हव्या.




## २. सर्वांना दिसेल याची खात्री करा

त्वरित पाहुण्यांना विचारून घ्या की तुम्ही जे दाखवताय ते सर्वांना दिसलं की नाही.




## ३. बघण्यासाठी/ऐकण्यासाठी पुरेसा वेळ द्या

काही क्षण शांत रहा जेणेकरून पाहुण्यांना ते दृश्य नीट पाहून, ऐकून घेऊ दे.



## ४. स्पष्टपणे दर्शवून वर्णन करा

त्यानंतर पाहुण्यांना जे दिसलं त्याचं वर्णन सांगायची वेळ येते. प्राण्याचं नाव सांगून पुरेसं नाही तर मुख्य म्हणजे तिथं काय चाललं आहे आणि प्राण्याचं वर्णन. प्राण्याचं एकेक वैशिष्ट्य, घडत असलेलं एकेक वर्तन दाखवून देऊन त्याचं वर्णन केलं तरी ते दृश्य पाहुण्यांसाठी खास आणि अविस्मरणीय होऊन जातं. त्या मानाने त्याचं वजन, प्रजनन काळ, खाद्य इत्यादी ठोकळेबाज माहितीचा प्रभाव खूपच कमी होतो.



आता दुसरं एक उदाहरण पाहू. समजा तुम्ही आणि तुमचे अतिथी मलबारी धनेशाची जोडी एका वडावर फळ खाताना न्याहाळताय. सगळयांनी ते पक्षी बघितले याची खात्री करून घेऊन मग तुम्ही त्यांना थोडा वेळ त्यांचं निरीक्षण करू द्या. मग तुम्ही बोलायला सुरुवात करा. यावेळी तुम्ही साधारण कोणकोणत्या गोष्टी सांगू शकता बघा:

- एवढी बोजड चोच असून सुद्धा ते किती आरामात ती नाजुक फळं तोडू शकतात
- कुठलंही फळ न तोडता नेमकं पिकलेलं हवं ते फळ कसं तोडतात
- ते नेमकं कोणत्या प्रकारचं वडाचं झाड आहे
- धनेश हे त्या झाडाच्या बिया पसरवणारे मुख्य प्रसारक असू शकतात
- (कदाचित) या वर्षी त्या झाडाला गेल्या वर्षीपेक्षा अधिक फळधारणा झालेली आहे
- नर आणि मादी धनेशाच्या डोळे आणि चोचीच्या रंगातील फरक दाखवून द्या
- असंच आणखी काही काही

तुम्हाला धनेशांच्या विस्मयकारक प्रजनन आणि घरट्याबद्दल माहिती असू शकेल. पण ते आत्ता तुमच्या समोर घडत नसल्याने ते नंतर सांगितलं तरी चालेल. इतर काही माहिती असेल तर तीही नंतर देऊन चालेल.

## ५. समारोप

एखादं दृश्य पाहून पुढे निघण्यापूर्वी एखादी समारोपाची ओळ नेहमीच चांगली वाटते.




*तुमच्या पुढच्या भ्रमंतीत हा असा क्रम नक्की वापरुन पहा!*

# वनस्पतींसाठी मार्गदर्शन

पाहुण्यांना वनस्पती दाखवताना अवलोकन क्रम थोडा बदलावा लागतो. हेतू हाच असतो की त्यांना त्या वनस्पतीचा संपूर्ण संरचित अनुभव देता यावा. वनस्पतींची माहिती सांगताना त्यांचं शास्त्रीय नाव आणि औषधी उपयोग सांगणं पुरेसं नाही.

वनस्पतींची विविध वैशिष्ट्ये अगदी जवळून आणि निरखून पाहण्याची उत्तम संधी असते. तिच्या अधिवासातील त्या वनस्पतीचे महत्व तुम्ही सांगू शकता. कोणकोणते प्राणी त्या वनस्पतीवर कशा प्रकारे अवलंबून असतात, ती वनस्पती कोणकोणत्या नावांनी ओळखली जाते, त्या नावात दडलेला मनोरंजक अर्थ किंवा त्या वनस्पतीशी निगडीत रंजक गोष्टी तुम्ही सांगू शकता.





हे पान बघा जरा. प्रत्येक पानाच्या तीन पर्णीका आहेत.
आणि हे पान कुठल्या तरी अळीने कुरतडून टाकलेलं दिसतंय.
किती सुंदर फूल! ह्या ऋतुची राणीच जणू!
रंग आणि आकार बघा कसा पक्ष्यांना आकर्षित करून घेण्यासाठी बनला आहे. फुलांची मांडणी पण अशी आहे की मकरंद घ्यायला पक्षी फुलाच्या देठावर बसला की त्याच्या अंगावर परागकण आपोआप चिकटतील.
ही शेंग बघा. प्रत्येकीत एकच बी आहे. बिया पण अगदी चपट्या.
ह्याला जंगल ज्योत पण म्हणतात ना?
हो, आणि इथले लोक ह्याला पळस म्हणतात.

# अतिथींची काळजी

चांगले मार्गदर्शक चांगले यजमान सुद्धा असतात. दौरा किंवा भ्रमंतीदरम्यान अतिथींची काळजी वाहिल्याने एकंदर अनुभव उबदार आणि अगत्यशील होऊन जातो. अधूनमधून अतिथींना काही त्रास नाही ना याची खात्री करत राहावी. चांगल्या मार्गदर्शकाला त्यांच्या गरजा आणि त्यांना लागणाऱ्या सुविधांची माहिती असावी लागते. अर्थात एका मर्यादेपर्यंतच. उदाहरणार्थ, सावलीत थोडा वेळ थांबणे, अवघड वाटेवर हात देणे, काट्याकुटयांची आगाऊ सूचना देणे, त्यांचा थकवा लक्षात घेऊन मध्ये मध्ये विश्रांती घेणे इत्यादी.









# वेळेचे नियोजन

वेळेचे पालन आणि पूर्वनियोजित कार्यक्रमात बदल न करणे कोणत्याही भ्रमंतीच्या यशस्वी आयोजनात आवश्यक असते. सर्वप्रथम, पाहुण्यांना भेटून भ्रमंती सुरू करण्यासाठी वेळेत किंवा वेळेच्या आधीच ठरलेल्या ठिकाणी पोहोचा. उपक्रम सुरू असताना वेळेचे नीट नियोजन करा जेणेकरून ठरलेल्या नियोजनप्रमाणे भ्रमंती संपवता येईल. काही कारणाने नियोजित वेळेत उपक्रम पूर्ण होणार नाही असे वाटल्यास किंवा तुम्हाला एखादी रंजक अशी नवी जागा दाखवावी वाटली तर ती पाहुण्यांच्या पूर्वपरवानगीने दाखवावी किंवा योग्य त्या परवानग्या घेऊन मगच योजना बदलावी.



# नंतर सांगायच्या गोष्टी

या आधीच आपण चर्चा केल्याप्रमाणे कुणीही मार्गदर्शक सर्वज्ञानी नसल्याने प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्यांच्याकडे असेलच असे नाही. अनेकदा मार्गदर्शक ओळखू शकत नाही असे प्राणी दिसतात किंवा मार्गदर्शक समजू शकत नाही असे नजारे बघायला मिळतात. अशा वेळी प्रामाणिक असणं कधीही चांगलं. तुम्ही म्हणू शकता, 'याचं उत्तर मला माहीत नाही' किंवा 'हे काय असावं मलाही कळत नाही' किंवा 'कदाचित हे अमुक असावं' आणि मग लगेच 'मी माहिती काढतो आणि तुम्हाला नंतर सांगतो.' असं सांगितल्यावर शक्य तितक्या लवकर ती माहिती काढून पाहुण्यांना ती सांगणे ही मार्गदर्शकाची जबाबदारी होते! पाहुण्यांचा ईमेल विचारून घेऊन त्यावर ती माहिती तुम्ही पाठवू शकता. मोठा दौरा असेल तर तुमच्या मोकळ्या वेळात ते उत्तर शोधून काढून दौरा संपण्यापूर्वी ते पाहुण्यांना सांगावं.



# सर्व ज्ञानेंद्रियांचा वापर

जंगलात फिरत असताना तुम्हाला त्याचा अनुभव किती तरी विविध प्रकारे घेण्याची संधी मिळते. हा अनुभव अधिक विस्तृत आणि संपृक्त करण्यासाठी सर्व ज्ञानेंद्रिये वापरा. पाहुण्यांना त्यांचा अनुभव मनात घर करून ठेवायचा असेल तर त्यांना स्पर्श, वास आणि चव (सुरक्षित असेल तरच!) या संवेदना वापरायला लावा. दृष्टी आणि आवाज या संवेदना सतत वापरल्या जातात पण वनस्पतींचे अवलोकन करताना इतर संवेदना वापरण्याची अधिक संधी मिळते.



# दृश्य साधने

कित्येकदा असं होतं की तुम्हाला काही तरी दिसतं पण ते पाहुण्यांना दाखवता येत नाही किंवा एखादी गोष्ट सांगितली जाते पण ती प्रत्यक्षात बघायला मिळत नाही. अशा वेळी दृश्य साधने उपयोगी येतात. मार्गदर्शक चटकन मार्गदर्शी पुस्तिका बाहेर काढून अशा न दिसलेल्या प्राण्यांची चित्रे दाखवू शकतात. समजा, तुम्हाला एक गायबगळा दिसला आणि तुम्ही त्याचा प्रजननकालीन सुंदर रंगीत पिसारा कसा असतो ते पाहुण्यांना सांगताय. अशा वेळी त्यांनी केवळ कल्पना करण्यापेक्षा पुस्तक काढून त्यांना चित्र दाखवणं जास्त चांगलं. किंवा तुम्हाला एखादा साप दिसला आणि पाहुण्यांनी बघण्या आधीच तो नजरेआड झाला तर तुम्ही त्याचं पुस्तकातील चित्र त्यांना दाखवू शकता.



# विशेष भेट

मार्गदर्शकाकडून असलेल्या अपेक्षांच्या पलीकडे जाऊन त्यांनी जर काही केलं तर पाहुण्यांचा अनुभव एका वेगळयाच उंचीवर पोचतो. अशा असंख्य गोष्टी आहेत ज्या तुमच्या दौऱ्याला एक विशेष ओळख देऊ शकतात. आमच्या पहिल्या दोन प्रशिक्षणात सहभागी झालेल्या मार्गदर्शकांनी काही कमाल कल्पना लढवल्या होत्या:

- भ्रमंतीच्या अखेरीस पाहुण्यांना वाहत्या गार पाण्यात पाय बुडवून बसायला सांगायचं आणि मार्गदर्शकाने शक्य असेल तर काही खायला द्यायचं
- एखाद्या मोठ्या वडाच्या किंवा पिंपळाच्या झाडाखाली काही वेळ ध्यानस्थ बसायला लावायचं
- एखादी स्थानिक हस्तकलेची वस्तू भेट म्हणून द्यायची
- नजीकच्या संवर्धन केंद्राला भेट द्यायची
- टोपली-होडीतून फेरफटका मारत स्थानिक कोळी लोकांच्या कथा ऐकण्याची संधी द्यायची



## भटकंतीचा समारोप

भ्रमंती संपण्यापूर्वी काही वेळ आधी मार्गदर्शकाने अतिथींना वेळ संपत आल्याची जाणीव करून द्यायला हवी. आणि निरोप घेण्यापूर्वी काही मिनिटे आपण कायकाय बघितलं त्याचा आढावा घेतला तर अतिथींच्या मनात भ्रमंतीचा अनुभव दीर्घ काळ जाणवत राहिल. व्यवस्थित निरोप घ्या आणि शुभेच्छा द्या. त्यांनी टीप देण्याची वाट बघत थांबणे किंवा आपल्या मोबाईलमध्ये बघत अचानक निघून जाणे चांगलं दिसत नाही. जर एकाहून अधिक दिवसांची ट्रीप असेल तर तुम्ही प्रत्येक भ्रमंतीनंतर किंवा प्रत्येक दिवसाच्या शेवटी आढावा घेऊ शकता.



## वन्यजीव पर्यटन आणि मार्गदर्शकांसाठी

# नीती नियमावली

मानवी हस्तक्षेपामुळे गेल्या काही दशकांमध्ये निसर्ग लहरी आणि प्रकोपकारी झाला आहे. निसर्ग पर्यटन करताना स्वतः नीतीनियमाने वागणे आणि पर्यटकांना तसे वागण्यास बाध्य करणे ही आपली निसर्ग मार्गदर्शक म्हणून मोठी जबाबदारी आहे. निसर्ग पर्यटन ही अलभ्य अशी सुविधा आहे आणि ज्या पर्यावरणात आपण जाणार, ज्याचा आस्वाद घेणार त्याच्यावरच आपल्यामुळे होणारे दुष्परिणाम शक्य होतील तितके कमी करणं आवश्यक आहे.
नीतिनियम म्हणजे कायदा किंवा बंधन नव्हे. कोणत्याही व्यक्तीचे निर्णय आणि कृती यांवर परिणाम करणारी ती  वैयक्तिक नितीमत्तेची तत्वे आहेत.

आम्ही वारंवार दिसण्यात येणाऱ्या काही अनिष्ट प्रथा इथे देत आहोत. त्या सहजपणे टाळता येण्यासारख्या आहेत.



# कचरा करू नका

कचरा हा बघायलाच नकोसा वाटतो. त्यातही नैसर्गिक अधिवासात तर अगदीच अखडतो. शिवाय वन्य प्राणी चुकून त्यातले काही पदार्थ खातात आणि त्यांची प्रकृती त्यामुळे बिघडते असंही आढळून आलेलं आहे. उरलेलं, शिळं अन्न टाकून देण्याचेही असेच परिणाम आहेत. या अशा अन्नाकडे प्राणी आकर्षिले जातात आणि ते खाऊन आजारी पडतात किंवा मरतात देखील. रस्त्याच्या कडेला असे अन्न टाकल्यामुळे ते खायला येणाऱ्या प्राण्यांचे रस्त्यावर वाहनांशी अपघात होण्याची शक्यता वाढते.

तुमच्या भटकंतीसाठी आणलेलं सर्व सामान नीट जमा करा आणि ते परत नेऊन तुमच्या गावात किंवा शहरात त्याची योग्य विल्हेवाट लावा.



# गोंगाट नको

निसर्गावर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या आपल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कमीत कमी गोंगाट करणे याचा सुद्धा समावेश असला पाहिजे. गोंगाटामुळे प्राणी त्रस्त होतात आणि तुमची त्यांना बघण्याची संधी सुद्धा वाया जाऊ शकते. बुजऱ्या आणि माणसांना घाबरणाऱ्या प्राण्यांच्या बाबतीत हे होतंच होतं. सर्वजण शांत असतील तर निसर्ग भ्रमंती करणाऱ्या प्रत्येकालाच एक चांगला अनुभव घेण्याची संधी मिळते, निसर्गातले आवाज नीट ऐकायला मिळतात, तुम्हाला दिसणाऱ्या प्राण्यांचे नैसर्गिक वर्तन बघायला मिळते.



# पार्टी नको!

वन्यजीवांच्या अधिवासात पार्टी केल्यामुळे, जोरजोरात गाणी लावल्यामुळे त्यांना अर्थातच त्रास होतो. अशा ठिकाणी मद्यधुंद झाल्यास तुमचा स्वतःचा जीव सुद्धा धोक्यात येऊ शकतो. नैसर्गिक अधिवासात अशा प्रकारच्या बेजबाबदार पार्ट्यांच्या खाणाखुणा नेहमी मिळतात. टाकून दिलेले कागद, पत्रावळ्या, सिगरेटची थोटके, उरलेलं अन्न, बीयरच्या फुटलेल्या बाटल्या हे दृश्य किळसवाणं असतंच. त्याहीपेक्षा अधिक ते वन्यजीवांसाठी धोकादायक असतं.




# तोडू-ओरबाडू नका

एखादं सुंदर फूल दिसलं की आपण नकळत ते तोडून त्याचा वास घ्यायला बघतो किंवा ते केसात किंवा टोपीत सजवतो. वनस्पतींच्या विश्वाची ओळख असल्यामुळे त्यांच्या आयुष्यात फुलांचे किती महत्व आहे ते आपण जाणतोच. शिवाय त्यांच्यावर अवलंबून असलेल्या प्राण्यांसाठी सुद्धा ती महत्वाची असतात. त्यामुळे फुले तोडू नयेतच. इतर अनेक सुंदर वस्तू निसर्गात आढळतात: खडे, जीवाश्म, पिसे, बिया इत्यादी. त्यांना नीट बघितल्यावर होत्या तिथेच ठेवून द्या. त्या घरी आणू नका. त्याऐवजी फोटो घ्या, चित्र काढा.




# हाताळू नका

आजकाल प्राण्यांना हाताळण्याची फॅशन आली आहे. बेडूक, साप किंवा काही किटक जास्त करून हाताळले जातात. त्यांना नीट पाहण्यासाठी किंवा चांगले फोटो काढण्यासाठी हे केलं जातं. किंवा मग मार्गदर्शकाला रुबाब दाखवायचा असतो. प्राण्यांना हाताळणे हे हाताळणारा आणि प्राणी या दोघांसाठी धोकादायक असल्यामुळे पर्यटन क्षेत्रात तरी ते पूर्णपणे टाळलं पाहिजे. विज्ञान शिकताना सुद्धा नवीन पद्धती अधिक संवेदनशील आणि प्राणीप्रेमी होत चालल्या आहेत.



# पक्ष्यांच्या रेकॉर्डेड आवाजाच वापर नको

पक्ष्यांचे रेकॉर्ड केलेले आवाज स्पीकरवर लावून पक्ष्यांना आकर्षित करून घेण्याची पद्धत हल्ली खूपच बोकाळलेली आहे. नीट बघता यावेत किंवा चांगले फोटो मिळावेत म्हणून हे केलं जातं. आवाज ऐकून पक्ष्यांना वाटतं की कुणी स्पर्धक किंवा भक्षक आसपास आहे. त्यामुळे ते बाहेर पडतात. हे प्रकार अती झाल्यास पक्ष्यांवर त्याचे दुष्परिणाम होतात एवढं नक्की. त्यामुळे ते टाळावेच.



# प्रखर दिवे नको

रात्रीच्या वेळी फोटोग्राफी करण्यासाठी प्रखर दिवे वापरणं अगदीच टाळता येण्यासारखं आहे. चांगले फोटो घेणे ही काही प्राण्यांना त्रास देण्यासाठी सबब असू शकत नाही. रात्रींचर प्राण्यांचे डोळे अतिशय संवेदनशील असतात आणि प्रखर प्रकाशात त्यांना तात्पुरतं अंधत्व येऊ शकतं. आणि आता तर निरनिराळे फिल्टर्स आणि उत्तम प्रतीचे फ्लॅश उपलब्ध असतात. किंवा मग कमीतकमी वेळासाठी मंद प्रकाशाचा वापर तरी करणं शक्य आहे.



# प्राण्यांना आमिष नको

मजेखातर, नीट बघता यावेत म्हणून किंवा चांगले फोटो मिळावेत म्हणून प्राण्यांना आमिष दाखवून एखाद्या ठिकाणी आकर्षित करणे ही अतिशय घातक कृती आहे. आपल्या देशात अशा प्रकारे पर्यटकांसाठी पक्ष्यांना आणि क्वचित महामार्जार म्हणजेच वाघ, सिंहांना आकर्षित करण्याच्या घटना घडलेल्या आहेत. पण यामुळे प्राण्यांच्या नैसर्गिक वर्तनात बदल होतो आणि त्यांना माणसाचे भय वाटेनासे होते. शिवाय यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याची शक्यता असते. किंवा मग काही वन्यजीव चोरट्या शिकाऱ्यांच्या आयतेच जाळ्यात सापडू शकतात. मार्गदर्शक किंवा पर्यटक म्हणून तुम्हाला अशा घटना घडताना आढळल्या तर लोकांना त्यापासून परावृत्त करा, अधिकाऱ्यांना कळवा किंवा मग अशा ठिकाणी जाणे टाळा.



# घरट्यांपासून दूर रहा

कोणत्याही प्राण्याच्या आयुष्यातला सर्वात महत्वाचा काळ असतो प्रजननाचा. यशस्वी प्रजनन झाले तरच पुढच्या पिढीची निश्चिती होते. या काळात प्राणी अधिकच भित्रे आणि संवेदनशील होतात. त्यामुळे तुम्हाला एखादं घरटं दिसलं तर ते दुरूनच न्याहाळा.



# पाठलाग टाळा


कोणताही प्राणी तुमच्यापासून दूर जात असेल तर त्याचा अर्थ असा होतो की त्याला अंतर हवं आहे. त्याच्या ह्या इच्छेचा मान ठेवा. त्याचा पाठलाग करू नका. प्राणी तुम्हाला घाबरून दूर पळत आहेत हे दृश्य बघण्यासाठी तुम्ही आलात का? प्राण्यांना सुद्धा ताण येतो आणि नैसर्गिक क्रिया करण्यास लागणारी ऊर्जा अशा प्रकारे पळण्यात, लपण्यात वाया जाते.



# प्राण्यांना खाऊ घालणे टाळा

आपल्याकडे प्राण्यांना अन्न देणे ही भूतदया मानली जाते. पण वन्यप्राणी त्यांचे अन्न मिळवण्यास सक्षम असतात. इतकंच नाही तर प्राण्यांना खाऊ घालून लोक त्यांचं नुकसानच करत असतात. आमिष दाखवण्याच्या प्रकारासारखेच यामुळेही प्राणी बिनधास्त होऊन मनुष्यवस्तीत किंवा रहदारीच्या ठिकाणी वावरायला लागतात. याचा प्राणी आणि माणूस या दोघांनाही त्रास होणार असतो. रस्त्यांवर निष्काळजीपणे फिरताना त्यांचे अपघात होऊ शकतात.


फार जवळून संबंध आल्यास प्राण्यांकडून माणसांना किंवा उलट मार्गाने काही रोगांचा प्रसार होऊ शकतो.



# पर्यटनस्थळाचे नियम पाळा

भारतातील बहुतेक निसर्ग पर्यटन स्थळांवर – विशेषतः अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने – काही नियम आणि कायदे लागू असतात. त्यामुळे त्या क्षेत्रात कोणत्याही उपक्रमाचे आयोजन करताना त्या सर्वांची माहिती स्वतः करून घ्या आणि तुमच्या पाहुण्यांना करून द्या. ते पाळले जातील याकडे कटाक्षाने लक्ष द्या. वेळ, वाहनांचा वेग, प्रवेश परवाने इत्यादी नियमांचे काटेकोर पालन करा.







# बेकायदेशीर वर्तन टाळा

वन्यजीवांच्या रक्षणासाठी भारतात कठोर कायदे आहेत. त्यामुळे कोणत्याही बेकायदेशीर बाबीत तुम्ही गुंतू नका. उलटपक्षी, तुम्ही वन्यजीव रक्षणाचा संदेश पसरवण्यास हातभार लावू शकता. कोणताही वन आणि वन्यजीवांशी निगडीत गुन्हा किंवा प्रतिबंधित कृती तुमच्या निदर्शनास आल्यास तात्काळ योग्य ती दक्षता घेत त्याची माहिती अधिकाऱ्यांना द्या.









निसर्ग मार्गदर्शकासाठी केवळ कामाच्या वेळी वन्यजीवांचे क्षेमकुशल असावे म्हणून ह्या नियमावलीचे पालन करणे पुरेसं नाही. रोजच्या आयुष्यात अनेक लहानमोठे निर्णय घेऊन आपण निसर्ग संरक्षणाच्या प्रयत्नांना हातभार लावू शकतो. नियमितपणे ओल्या सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करणे, अविघटनशील प्लॅस्टिक, थर्माकोल आणि तत्सम वेष्टनांचा कमीतकमी वापर करणे, स्थानिक संवर्धन प्रकल्पांना साथ देणे इत्यादी. या पृथ्वीवरील आपला अमंगळ ठसा कमी करण्यासाठी या सर्व गोष्टींचा हातभार लागू शकतो.

# ऋणनिर्देश

अशा प्रकारची हस्तपुस्तिका तयार करण्याची संकल्पना आणि ती प्रत्यक्षात आणण्याच्या प्रवासातील अनेक सुचनांसाठी दिव्या मुडप्पा आणि टी. आर. शंकर रमण यांचे आम्ही आभार मानतो.

या पुस्तकाची मुख्य चित्रकार मनसा मुरारी हिच्या सोबत काम करताना अतिशय मजा आली. आम्हाला काय सांगायचं आहे ते नीट समजून घेऊन तिच्या आकर्षक कलेच्या माध्यमातून ती मांडत गेली.

संगीता एस. मणी यांनी केलेले मुद्रितशोधन  आणि वेळोवेळच्या सूचना यासाठी आम्ही आभारी आहोत. आमची कुशल डिजायनर जान्हवी रंजन हिने संयमपूर्वक आमच्या सोबत काम करुन हे पुस्तक शेवटास नेलं त्याबद्दल तिला धन्यवाद.

अखेरीस रोहिणी निलेकणी फिलअँथ्रोपिज, चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनॅन्स कं. लि. आणि रेनमॅटर फाऊंडेशन यांनी केलेल्या आर्थिक सहयोगातून हे पुस्तक शक्य होऊ शकलं. त्यांचे आभार.

# भ्रमंतीसाठी प्रश्नसूची

- [ ] दुर्बिण
- [ ] मार्गदर्शी पुस्तिका
- [ ] प्रथमोपचार संच
- [ ] वही/पेन
- [ ] फोन
- [ ] कॅमेरा
- [ ] ऋतुपरत्वे: रेनकोट, जळूप्रतिबंधक मोजे, टोपी इत्यादी
- [ ] पिण्याच्या पाण्याची बाटली

विशिष्ट भ्रमंतीसाठी तुमची यादी:

- [ ] प्रवेशिका/परवानगी
- [ ] अतिथी किंवा त्यांच्या वाहन चालकाचे संपर्क क्रमांक
- [ ] हवामानाचा अंदाज
- [ ] भ्रमंती मार्गाची पडताळणी
- [ ] अलीकडच्या नवीन नोंदी किंवा ऋतुतील विशेष नोंदी
- [ ] नवीनतम बातम्या, संवर्धन समस्या, इतिहास, संस्कृती यांचे वाचन

अतिथींना सुरुवातीस सांगण्यासाठी मुद्दे

१.

२.

३.

४.

५.

६.

७.

८.

९.

१०.

# स्वयंमूल्यनिर्धारण करण्यासाठी प्रश्नसूची

तुमची भ्रमंती कशी झाली? अतिथी खुश झाले का? तुम्ही कोणती गोष्ट सर्वात चांगली केली?

तुम्ही ठरलेल्या वेळेच्या आधी पोचलात का?

- ☐ हो
- ☐ अगदी वेळेत
- ☐ उशीर झाला

तुमची तयारी परिपूर्ण होती का?

- ☐ हो
- ☐ अजून चांगली करता येईल

पुढच्या वेळी अजून चांगली तयारी करण्यासाठी काय कराल?

तुमची ओळख आणि प्रस्तावना कशी झाली?

---

---

---

मार्गदर्शनाची कुठली तंत्रे तुम्ही नीट वापरली?

- ☐ शोधाचा क्षण
- ☐ सर्वांना दिसेल याची खात्री करा
- ☐ बघण्यासाठी/ऐकण्यासाठी पुरेसा वेळ द्या
- ☐ स्पष्टपणे दर्शवून वर्णन करा
- ☐ गोषवारा द्या

अतिथींची काळजी. अतिथींना अधिक आरामशीर वाटण्यासाठी तुम्ही काही केलं का?

- ☐ हो
- ☐ आणखी करता आलं असतं
- ☐ संधी मिळाली नाही

तुम्ही अतिथींना कोणकोणत्या संवेदना वापरायला लावल्या?

- ☐ नजर
- ☐ श्रवण
- ☐ गंध
- ☐ स्पर्श
- ☐ चव

तुम्ही कोणती दृश्य साधने वापरली का?

- ☐ हो
- ☐ नाही
- ☐ संधी मिळाली नाही
- ☐ पुस्तके किंवा फोन सोबत घेतला नव्हता

भ्रमंतीची अखेर व्यवस्थित हसतखेळत निरोप घेऊन केली का?

- ☐ हो
- ☐ नाही
- ☐ आणखी चांगली करता आली असती

तुम्हाला काही माहिती मिळवून अतिथींना द्यायची आहे का?

- ☐ हो, मी त्यांचे संपर्क क्रमांक घेऊन ठेवले आहेत
- ☐ असे काही प्रश्नच आले नाहीत
- ☐ हो, पण माहिती कुठून मिळवायची मला माहीत नाही
- ☐ हो, पण मला प्रश्न आठवत नाही
- ☐ हो, पण मी त्यांचे संपर्क क्रमांक घेतले नाही

तुम्ही स्थानिक संवर्धन समस्या आणि प्रकल्पांची माहिती देऊ शकलात का?

- ☐ हो
- ☐ नाही

तुम्ही नीतिनियम पाळू शकलात का? अतिथींना ते पाळायला लावू शकलात का?

- ☐ हो, आणि अतिथी माझी तत्वे पाहून खुश झाले
- ☐ हो, पण अतिथी जाराज झाले
- ☐ नीतिनियम आणखी चांगल्या प्रकारे सांगता आले असते
- ☐ अतिथी अगदीच नियंत्रणात नव्हते
- ☐ मला मोह टाळता आला नाही

अतिथींच्या अनुभवाला एक खास ओळख देता आली का?

- ☐ हो, अतिथी खूपच आनंदी झाले
- ☐ संधीच नव्हती
- ☐ मी आणखी चांगलं केलं असतं

या भ्रमंतीत तुम्ही नवीन काय पाहिलं किंवा शिकलात?

___

___

___

___

nature
conservation
foundation

'Amrita' 1311, 12th A Main,
Vijayanagar 1st Stage, Mysore 570017